# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरूवार, दिनांक ९ मार्च, २०२३

## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

अशुद्धित प्रत

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री.रोहित पवार, दिपक चव्हाण, हसन मुश्रीफ, बाळासाहेब पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर चित्रनगरीत चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे निदर्शनास येणे, सदर बैठकीत चित्रनगरीचा अधिकाधिक विकास आणि आधुनिकीकरणाचे नियोजन करुन त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबरोबरच आवश्यक त्या निविदा काढण्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी आदेशित करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, तसेच सदर बैठकीत त्याचबरोबर सौरऊर्जा प्रकल्प बसविणे, बाहयस्तोत्रावर सुरक्षा रक्षक पुरवणे, कर्मचारी वर्ग पुरविणे, कोल्हापूर चित्रनगरीत आवश्यक तेथे पथदिवे लावणे, पाण्याची उच्चतम टाकी बांधणे याबाबतही चर्चा होऊन निर्णय घेण्यांत आला असल्याचेही निदर्शनास येणे, सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार त्याबाबत निविदा प्रक्रिया व अन्य तद्नुषंगिक कामे करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संजय जगताप, धिरज देशमुख, बळवंत वानखडे, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, माधवराव पवार, राजेश एकडे, अमीन पटेल, अस्लम शेख, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, रोहित पवार, विनोद निकोले, अजित पवार, जयंत पाटील,**

**छगन भुजबळ, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, दौलत दरोडा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला अधिक महत्त्व देण्यात येणे, त्यासाठी शैक्षणिक पात्रतेमध्येही बदल करण्यात येणे, त्यामुळे अनेक संस्था त्या-त्या समाजातील विद्यार्थ्यांचा संशोधनाचा टक्का वाढविण्यावर भर देत असून यासाठी अनेक योजनाही सुरू करण्यात आलेल्या असणे, मात्र आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच आलेली असणे, राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे संशोधनामध्ये येण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे प्रमाण वाढविण्यासाठी आणि या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे' ने अधिछात्रवृत्ती योजना सुरू करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून सुरू असूनही वित्त विभागाच्या अडथळ्यांमुळे अधिछात्रवृत्तीचा प्रश्न प्रलंबित असणे, परिणामी पीएचडी करून आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून बार्टी, सारथी व महाज्योती या तिन्ही संस्थांच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी बांधवांच्या खावटी कर्जावर वार्षिक नियोजन अवलंबून असणे, परंतू सन २०२२ मध्ये खावटी कर्ज वाटप न केल्यामुळे राज्यातील आदिवासी बांधवांची घोर निराशा झाली असल्याचे निदर्शनास येणे, चार हजार रुपयाप्रमाणे ११ लाख ५० हजार आदिवासी कुटूंबाला एकूण ४४० कोटी रुपयाचे खावटी कर्ज वितरीत करण्याचा शासनाला विसर पडल्याने दऱ्या-खोऱ्यांत आणि दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांना पुरक पोषण आहार न मिळाल्याने कुपोषनाचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास येणे, आदिवासी विकास विभागाच्या गाफील नियोजनामुळे शासनाचे ४४० कोटी रुपये अखर्चित राहील्याची गंभीर बाब समोर येणे, अद्यापपर्यंत आदिवासी विकास विभागाकडून नव्याने खावटी कर्ज वितरीत करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला किंवा कसे याबाबत अस्पष्टता असणे, या गंभीर बाबी कडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

(४) **श्री.अनिल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पारोळा (जि.जळगाव) येथील उपविभागामध्ये जलसंधारणाच्या विविध कामांमध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये उघडकीस येणे, याबाबत लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी जिल्हाधिकारी, जळगाव तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे तक्रारी करणे, त्यानंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये सदरील तक्रारींमध्ये तथ्य आढळणे, मात्र चौकशी समितीने अनियमितता केल्याच्या नावाखाली सदरील अधिकाऱ्यांना संरक्षण देणे, सदरील कामांवर ठेकेदाराच्या मूळ देयकापेक्षा वाढीव व बनावट देयके अधिकाऱ्यांनी मंजूर करून घेणे, साठवण बंधारा फाफोरे बु व साठवण प्र ऊ पिंपरी या कामांवर मर्यादेपेक्षा अनुक्रमे १४.५८ लक्ष व ५.५९ लक्ष इतके अतिरिक्त देयके मंजूर करून घेण्यात येणे, परंतु चौकशी समितीद्वारे सदरील खर्च कार्यालयीन बाबींवर केला गेल्याचे नमूद करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न करण्यात येणे, वास्तविक, कार्यालयीन बाबींसाठी जिल्हा नियोजन समितीकडून स्वतंत्र निधी देण्यात येत असतानाही अधिकाऱ्यांनी केलेली गैर कृत्ये झाकण्यासाठी चौकशी समितीने कार्यालयीन खर्चासाठी निधी वापरल्याचे सांगून शासनाची तसेच लोकप्रतिनिधींची फसवणूक व दिशाभूल करणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, जळगाव यांच्या चौकशी समितीचा अहवाल अद्यापही प्रलंबित असणे, गैरव्यवहार झालेला उघडकीस येऊनही संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार, सुरेश वरपुडकर, सुनिल केदार, विश्वजित कदम, कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री अमित देशमुख, धिरज देशमुख, अस्लम शेख, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, संजय जगताप, ॲड. राहूल कुल, तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या ४०० खाटांच्या नुतन इमारतीमध्ये भौतिक सुविधांची कामे व आरोग्य साधनांची पुर्तता तसेच सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये फेज २ इमारतीमध्ये न्युरो सर्जरी व कॅन्सर रुग्णांसाठी केमो थेरपी युनिट तातडीने कार्यान्वित होणे अतिशय गरजेचे असणे, आय.सी.यु., ऑपरेशन थेटर, लेबर

अमुद्रित प्रत

वॉर्ड, नवजात शिशु दक्षता विभाग तसेच पहिल्या मजल्यावर प्रस्तावित बाबींचा व नवनिर्माणाधिन इमारतीत स्त्री रुग्ण व नवजात शिशुंकरीता आवश्यक असलेल्या सोयी सुविधांकरिता तसेच फर्निचर व विद्युतीकरण आदी कामे करण्याकरिता निधीची गरज असणे, त्यादृष्टीने या दोन्ही रुग्णालयाच्या सर्व सुविधा कार्यान्वित होवून रुग्णांना त्याचा लाभ व्हावा यादृष्टीने शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची गरज असतांना त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **डॉ.राहूल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपॅथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पध्दतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे, राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरु असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतू आयुर्वेद उपचार पध्दतीचे समावेश शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबणा, शासनाने आयुर्वेदीक उपचार महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजनामध्ये समाविष्ठ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री.सुभाष धोटे, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील लाखोंच्या संख्येने असलेल्या इमारत व बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी शासनामार्फत चांगल्या योजना राबविण्यात येणे, सदर योजनांचा लाभ तळागाळातील सर्व कामगारांना मिळावा, यासाठी संबंधित खात्याच्या अधिकारी वर्गाकरिता चार चाकी वाहने उपलब्ध करून देण्यात येणे, शासनाच्या ग्रामपंचायत ते मंत्रालयापर्यंत कोणतीही वस्तु किंवा विशिष्ट वार्षिक खर्चाच्या अधिक असल्यास ती घेतांना खुली निविदा, टेंडर पध्दतीचा अवलंब करून घेणे बंधनकारक असणे, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, चंद्रपूर व कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयाअंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार अधिकारी,

गडचिरोली या कार्यालयाअंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात वाहन भाड्याने घेतांना कोणत्याही कायदेशीर प्रक्रिया न राबविता आपल्या जवळच्या लोकांशी संगनमत करून त्यांच्याकडून दरपत्रक घेऊन, त्यांचेशी करारनामा करून वाहने भाड्याने घेतल्याचा प्रकार उघडकीस येणे, संबंधित अधिकारी यांच्यासोबत भ्रमणध्वनीवर झालेला चर्चेचा पुरावा (क्लिप) मा.प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा.कामगार आयुक्त यांना दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी सादर केला असणे, यापूर्वी मंडळाच्या कामासाठी याचप्रकारे वाहने भाडेतत्त्वावर व्यवहार झाल्याची व त्या मोबदल्यात लाखों रुपये खर्च केल्याची माहिती संबंधित कार्यालयाकडून मिळाली असणे, याप्रकरणी संबंधित वाहनधारक व चालक-मालक संघटना वाहने पुरविण्यास सक्षम असताना विना टेंडर बाहेरच्या जिल्हयातील पासिंग असलेली वाहने घेण्यामागे अधिकारी वर्गाचे काहीतरी स्वारस्य असणे, संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करुन, त्यांचेवर निलंबनाची कारवाई करणेबाबत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे कामगारांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(८) **सर्वश्री. संग्राम थोपटे**, **अशोकराव चव्हाण**, **नानाभाऊ पटोले**, **अमित झनक**, **अमीन पटेल**, **कुणाल पाटील**, **संजय जगताप**, **वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“राज्यात मोठया प्रमाणावर गड किल्ले असून गड किल्ल्यांचे संरक्षण करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली असणे, विविध गड किल्ल्यांवर आवश्यक सोयी-सुविधा नसणे, किल्ल्यांची मोठया प्रमाणावर दुरावस्था झालेली असणे, राजगड, रायरेश्वर, रोहिडेश्वर, तोरणा, इत्यादी किल्यावर सुरक्षा रक्षकांकडून गैरवापर करीत असणे, अनेक किल्ल्याच्या पायथ्याशी जाण्यासाठी रस्त्याची सुधारणा अपुरी असणे, अनेक किल्ल्यांवर सातत्याने मागणी करुन रोप-वे ची सुविधा उपलब्ध नसणे, पर्यटकांना सोयी-सुविधांची कमतरता भासणे, राज्यातील सर्व किल्ल्यांची पहाणी करुन त्रुटी दूर करण्याची आवश्यकता, किल्ल्यांच्या दुरावस्थेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्यातील गड किल्ल्यांची झालेली दुरावस्था दूर करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : नवनिर्वाचित सदस्यांनी भारताच्या संविधानाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेणे किंवा गांभीर्यपूर्वक दृढकथन करणे.**

**दोन : प्रश्नोत्तरे.**

**तीन : शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा.**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. संजय केळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून विविध सोसायट्यांना टँकरद्वारे पाणी घेण्यास भाग पाडण्याचे कारस्थान टँकर लाँबी व पाणी पुरवठ्याचे कार्यकारी व उप अभियंता यांच्याव्दारे सुरु असणे. त्यामुळे टँकर लाँबी पोसण्यासाठी कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप ठाणे वासियांकडून करण्यात येणे, ही बाब दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, तथापि ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा योजनेतून माहे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ पासून झोनिंग पद्धतीने नियोजन करण्याचे निश्चित करणे, त्यामुळे शहरातील घोडबंदर, वागळे इस्टेट, समतानगर, वर्तक नगर, सिद्धेश्वर, जेल तलाव इत्यादी भागात पाणी पुरवठा झाला नसल्याने सबंधित विभागात टँकरने पाणी पुरवठा केला जाणे, या एकूणच प्रक्रियेत नागरिकांची टँकर लाँबीकडून आर्थिक लुट होत असल्याची गंभीर बाब उघड होणे, खाजगी टँकर पालिकेच्या पाणी वितरण व्यवस्थेकडून रु.७००/- प्रमाणे पाणी उचलत असणे, मात्र सोसायट्यांना सदर टँकरचे पाणी घेताना रुपये ४ ते ७ हजार मोजावे लागत असणे, गेल्या आठवडाभर ही संपूर्ण लुट महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी व उप अभियंता व तत्सम अधिकाऱ्यांच्या आर्शीवादाने सुरु असल्याचे उघड होणे, दरम्यान विविध सोसायट्यांना

अप्रकाशित प्रत

पाणी पुरवठा होत नसल्याने त्यांना नाईलाजास्तव खाजगी टँकरव्दारे अवाचेसव्वा रुपये मोजून पाणी विकत घ्यावे लागणे, यामध्ये शेकडो सोसायटीतील नागरिकांची प्रचंड आर्थिक लुट होणे, तथापि टँकर लॉबीकडून होणारी नागरिकांची लुटमार, यावर पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचे जाणूनबुजून दुर्लक्ष होणे, तसेच टँकरच्या झालेल्या फेऱ्या, वितरीत केलेले पाणी व नागरिकांची पाण्याची आवश्यकता याबाबतची आकडेवारी व माहिती उपलब्ध नसणे, तथापि ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाणी पुरवठा न होणे व कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न होणे, खाजगी टँकर लॉबीला आर्थिक लाभ मिळवून देणे, या गंभीर बाबी असून याची सक्षम प्राधिकरणाव्दारे चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(२) **श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“महाराष्ट्र राज्यातील बहुतांश नागरिकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असणे, शेतकऱ्यांच्या जमिनीचे सर्वे न. व गट न. चे सर्वेक्षण / मोजणी होऊन बराच कालावधी झालेला असणे,नकाशावरील दर्शवण्यात आलेले शेत / पाणंद रस्ते खूप जुन्या कालावधीतील असणे, शेतकऱ्यांच्या कुटुंबात वाटणी, खरेदी विक्री आदि कारणाने जमिनीचे क्षेत्र कमी झालेले असणे, पूर्वीच्या काळी असलेले मोठे बंधारे अत्यंत लहान झाले असणे, अशा कारणाने शेतकऱ्यांच्या शेतीला दळणवळणासाठी रस्ताच नसल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे,विज्ञान युगात शेतीची जवळपास सर्व कामे यंत्रावर अवलंबून असल्याने शेतीसाठी रस्त्याची नितांत गरज असणे,भविष्यात शेत रस्त्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, महसूल प्रशासनाने विविध कलमाखाली आदेशीत केलेली वहिवाटीचे रस्ते, वाटणी पत्रातील नमूद रस्ते, नकाशावर घेतली नसणे, सदरील रस्ते सातबारा वर नोंद करणे गरजेचे असणे, शेत जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीत तसेच कुटुंबाच्या वाटणी फेर मध्ये शेतीला जाणारा रस्त्याचा उल्लेख दर्शविणे व सदरील नोंदी सातबारा व इतर हक्कात घेणे बंधनकारक करण्याबाबत लोकप्रतिनिधींची शासनाकडे होत असलेली मागणी, त्याबाबत उचित कार्यवाही शासन स्तरावरुन झाली नसणे, शेत रस्त्यांचे वाद व प्रकरणे राज्यात महसूल विभाग, पोलिस ठाणे, आणि न्यायालयात सातत्याने दाखल होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यात अनेक शेतकऱ्यांना शेत रस्ता नसल्याने शेतकऱ्यांच्या माल पावसाळ्यात शेतातच पडून असणे, पाऊस व नैसर्गिक आपत्तीत सदरील धान्याच्या नुकसानीच्या अनेक घटना गावोगावी दरवर्षी होत असल्याचे दिसून येणे, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतीला रस्ता देण्यासाठी आवश्यक कार्यवाही राज्य शासनाच्या वतीने करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

(३) **श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अनेक तक्रारी वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून होत असणे, रुग्णालयात औषधांचा आवश्यक साठा असतांनाही कृत्रिम तुटवडा निर्माण करुन रुग्णांना बाहेरुन औषध विकत आणायला सांगण्यात येणे, त्यामुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणे, तसेच रुग्णालयातील अनेक वार्डात पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, परिणामी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकात वाढते असंतोषाचे वातावरण, रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये उक्त रुग्णालयाची सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करणे, सदर पाहणी दरम्यान रुग्णालयात पाण्याअभावी मोतीबिंदूच्या सर्जरीसाठी तीन रुग्णांना वाट पहावी लागण्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, शासनाने यासर्व प्रकरणी चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची चौकशी करुन औषधांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन रुग्णांना बाहेरुन औषध खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मु.का.अ.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या प्रमूख उपस्थितीत गुगल मिटिंगमध्ये चंदा बेलसरे व इतर आरोग्य सेविका यांनी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी मांडल्या असणे, अमरावती जिल्ह्यातील अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद आस्थापनेवरील आरोग्यसेविका पुष्पा वानखडे, चंदा बेलसरे, दिपाली शिंदे, पद्मा जाधव, सुनंदा नाथे, आदींनी राज्य सरकारकडून खालील मागण्या मंजूर करण्यात यावे या मागणीसाठी जिल्हा परिषद, अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा भा. प्र. से. यांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या गुगल मिटिंगमध्ये अमरावती जिल्ह्यातील आरोग्य सेविका यांनी भाग घेऊन मिटिंगमध्ये आरोग्य सेविका कृती समितीच्या वतीने चंदा बेलसरे आरोग्य सेविका पदाधिकारी यांनी आरोग्य सेविकांच्या हिताच्या एकूण १८ मागण्या मांडल्या असणे, ज्या जि.प. अमरावती संबधित आहेत त्या सोडविल्या जातील असे आश्वासन जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. ढोले यांनी दिले असणे,

अग्रिम प्रत

तर जे सरकारकडील विषय आहेत त्या सरकारचे मंत्रालयीन विभाग यांच्याकडे पाठविल्या असल्याचं त्यांनी सांगितले, अमरावती येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांना वरील मागणीचे निवेदनामार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्याकडे देऊन त्यांचे कार्यालयाचे उप आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक ५९९/२९२३ दिनांक १ मार्च, २०२३ रोजी अवर सचिव, आस्था.८, ग्राम विकास विभाग , बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट मुंबई, मंत्रालय यांना पाठवले असणे, विशेषत: यापूर्वीही सरकारने या मागणीचा विचार करून निर्णय घेण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत त्यांच्या उपस्थितीत नागपूर अधिवेशनादरम्यान राज्याचे आरोग्य मंत्री यांच्याकडे विधान भवनात तसेच राज्य सरकारचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ०१ ते १८ मागण्यांचे निवेदन दिलेले असणे, ज्या निवेदनामध्ये त्यांनी खालील प्रमाणे मागण्या मांडल्या होत्या त्यामध्ये सन २००५ नंतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका नियमित यांची पदभरती करून त्वरित रिक्त पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य सेवक याप्रमाणे आरोग्य सेविका यांना विना प्रशिक्षण पदोन्नती देण्यात यावी, प्रशिक्षणाची अट रद्द करण्यात यावी, तसेच सर्व आरोग्य सेविकांची ज्येष्ठता सूची लवकरात लवकर प्रशिक्षण पूर्ण करून घ्यावे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन एल. एच. व्हीं. पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य प्राथमिक केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन आरोग्यसेविका पदे भरण्यात यावी, तसेच तालुका स्तरावर आरोग्यसेविका पदनिर्मिती करण्यात यावी, तसेच रिक्त पदाचा उपकेंद्राचा मांडण्याकरिता आरोग्य सेविका यांना अतिरिक्त वेतन देण्यात यावे, तसेच वाढत्या पेट्रोलची महागाई पाहता आरोग्य सेविका यांचा कायम प्रवास भत्ता पंधराशे रुपये वरून तीन हजार रुपये करण्यात यावा, नियमित पदोन्नतीची नस्ती निकाली काढणे व पद रिक्त झाल्याबरोबर दुसऱ्या महिन्यात ज्येष्ठतेच्या यादीनुसार पात्र पदोन्नती देण्यात यावी, तसेच आरोग्य सेविकांना कार्य करण्याचा पाच दिवसाचा आठवडा करण्यात यावा, तसेच आरोग्य सेविका यांचे कायमस्वरूपी पदे भरण्यात यावी, तसेच कंत्राटी पद्धत बंद करण्यात यावी, तसेच कोरोना संक्रमण महामारीच्या काळात आरोग्य सेविका यांनी जिवाची काळजी न करता अहोरात्र काम केल्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढ देण्यात यावी, आरोग्य सेविका हिला चालू सेवाकाळामध्ये **GNN** ट्रेनिग **with salary** अशी पद्धत सुरु करणे, निवासस्थान राहणे योग्य नसल्यास आरोग्य सेविकांना घरभाडे भत्ता देण्यात यावा, तसेच सर्व ऑनलाईन पोर्टल जबाबदारी इतर कर्मचारी यांना देण्यात यावे जेणेकरून टेक्निकल कामकाज आरोग्य सेविकेला गुणवत्तापूर्वक सेवा रुग्णांना देता येतील, यासह एक ते १८ प्रकारचे आर्दींचा समावेश असलेले निवेदन आरोग्य सेविका यांनी राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदन देऊन अवगत केले असणे, परंतु अद्याप पर्यंत शासनाकडून वरीलप्रमाणे निर्णय झाला नसणे म्हणुन वरीलप्रमाणे शासन निर्णय, आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**पाच : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३.

**(३)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(दुपारी २-०० वाजता)**

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री : सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा